# <u>संविधान दिवस</u>

## (२६.११.२०२५)

गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित, सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर येथे दिनांक २६/११/२०२५ रोजी संविधान दिवस कार्यक्रम साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालायाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. राहुल भगत होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, 'भारतीय संविधानातील समता, बंधुता, समाजवाद व धर्मनिरपेक्षता ही मूल्ये अत्यंत महत्त्वाची आहेत. यांचा अंगीकार प्रत्येकाने आपल्या जगण्यात करायला हवा. असे केल्यास समाजात कोणतेही अराजक निर्माण होणार नाही. आजच्या अनेक प्रश्नांची उत्तरे संविधानातच दडलेली आहेत.'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे डॉ. सचिन वेरुळकर यांनी केले. अध्यक्षाच्या मार्गदर्शनाखाली 'उद्देशपत्रिका सामुहिक वाचन कार्यक्रम' घेऊन उद्देशपत्रिकाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ रेणुकादास उबाळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. राजेंद्र बेलोकार यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ६७ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रम महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. राहुल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.







Officiating Principal
Seth Narsingdas Mor College of Arts &
Commerce & Smt. G.D. Saraf Science College, Tumsar